ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# महानुभाव संप्रदायातील ‘प्रमाण’ विचार

*डॉ. सचिन ख. राजपूत,

* तत्त्वज्ञान विभाग, पु. ओं. नाहाटा महाविद्यालय, भुसावळ

**सारांश**

*ज्ञानमीमांसा ही तत्त्वज्ञानाची एक प्रमुख शाखा होय. भारतीय तत्त्वज्ञानात ज्ञानमीमांसेची पद्धतशीर सुरुवात प्राचीन न्यायदर्शनापासून झालेले दिसते. भारतीय तत्त्वज्ञानात ज्ञानमीमांसेची निर्मिती व विकास ही 'प्रमाण' या संकल्पनेभोवती फिरताना दिसते. जसे की, प्रमाण म्हणजे काय?, प्रमाणाचे स्वरुप काय?, एकुण प्रमाणे किती व कोण-कोणती मानायची? इत्यादि. 'प्रमाण' या शब्दाचा अर्थ 'यथार्थ ज्ञानाचे साधन' असा न्यायदर्शनाने केला, तर इतर दर्शनांनी सम्यकज्ञान, अविसंवादी ज्ञान, अबाधित ज्ञान अशा अर्थाने केला. अर्थात अशा प्रकारच्या 'प्रमाण' विषयक अनेक संकल्पना व व्याख्या भारतीय तत्त्वज्ञानात मांडल्या गेल्या व त्यांवर साधकबाधक चर्चा घडून आलेली दिसते. परंतु आपल्याला ही प्रमाणविषयक चर्चा फक्त भारतीय तत्त्वज्ञानातच पहावयास मिळते का? तर नाही. या व्यतिरिक्त पाश्चात्य तत्त्वज्ञाना बरोबरच भारतीय संप्रदायातही प्रमाणविषयक भूमिका पहावयास मिळते. त्यात विशेष करुन महानुभाव संप्रदायातील प्रमाणविषयक विचार पाहता भारतीय दर्शनांपेक्षा अतिशय वेगळी स्वरूपाची भूमिका पहावयास मिळते. त्यामुळे या शोध निबंधात महानुभाव संप्रदायातील 'प्रमाण'विषयक विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना :**

सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र यांप्रमाणेच ज्ञानमीमांसा (ज्ञानशास्त्र) ही तत्त्वज्ञानाची एक महत्त्वाची शाखा समजली जाते. माणसाला ज्ञान होते म्हणजे नेमके काय? ज्ञानाची साधने किंवा मूलस्रोत कोणते? ज्ञानाच्या आवश्यक व पर्याप्त अटी कोणत्या? ज्ञानाची व्याप्ती व मर्यादा कोणती? या सर्व प्रश्नांची चर्चा ज्ञानमीमांसेत होते. मानवी ज्ञानाचे वर्णन आणि मूल्यमापन करताना ज्ञान, भ्रम, प्रत्यक्ष ज्ञान, प्रतीती, विधान, सत्य अशा ज्या मूलभूत संकल्पना वापरल्या जातात, त्यांचे विश्लेषण करून त्यांचे आशय स्पष्ट करणे, त्यांचा परस्परसंबंध निश्चित करणे हे ज्ञानमीमांसेचे एक प्रमुख कार्य होय. ज्ञानशास्त्राचा विचार हा भारतीय आणि पाश्चात्य अशा दोन दृष्टिकोनातून केला जाऊ शकतो. यापैकी भारतीय दृष्टिकोनातून विचार केला तर भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ज्ञानमीमांसेची पद्धतशीर सुरुवात प्राचीन न्यायदर्शनापासून झालेले मानली जाते. आपल्याला भारतीय ज्ञानमीमांसेची निर्मिती व विकास ही ‘प्रमाण’ या संकल्पनेभोवती झालेली दिसून येते. ‘प्रमाण’ या शब्दाचा अर्थ ‘यथार्थ ज्ञानाचे साधन’ असा न्यायदर्शनाने केला, तर इतर दर्शनांनी सम्यकज्ञान, अविसंवादी ज्ञान, अबाधित ज्ञान अशा अर्थाने केलेला दिसतो. अर्थात अशा प्रकारच्या ज्ञानाचे साधन असा ‘करण’

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

वाचक अर्थही त्यांना मान्य होता. यातून 'प्रमाण' विषयक अनेक संकल्पना व व्याख्या मांडल्या गेल्या व त्यांवर साधकबाधक चर्चा घडून आलेली दिसते.

प्रमाणे कोण कोणती मानायची, त्यांची संख्या किती हाही भारतीय दर्शनांमधील वादाचा एक मुख्य विषय राहिला आहे. यावर तर नागार्जुन या बौद्ध आचार्याने कोणतेच प्रमाण सिद्ध होत नाही, अशी टोकाची भूमिका घेतलेली दिसून येते. प्रमाण व प्रमेय हे सापेक्ष आहेत व म्हणून स्वभावरहीत व शून्य आहेत, असे त्यांचे प्रतिपादन होते. जयराशिभट्ट या लोकायत मताशी जवळीक साधणाऱ्या तत्त्वचिंतकाने सर्व प्रमाणे नाकारणारा 'तत्त्वोपल्लवसिंह' हा ग्रंथ लिहिला; पण इतर बहुतेक दर्शनांनी प्रमाणांचे अस्तित्व स्वीकारलेली दिसतात. त्यापैकी चार्वाक किंवा लोकायत दर्शनाने 'प्रत्यक्ष' हे एकमेव प्रमाण स्वीकारले. तर बौद्ध व वैशेषिक दर्शनांनी प्रत्यक्षाबरोबर अनुमान हेही प्रमाण मानले आहे. सांख्य-योग दर्शनाने प्रत्यक्ष आणि अनुमान या दोन प्रमाणांच्या जोडीला आप्तवचन या प्रमाणालाही मान्यता दिलेली दिसते. न्यायदर्शनाने या तीन प्रमाणांबरोबर उपमान हे चौथे प्रमाण मानले. कुमारिलभट्टांनी प्रवर्तित केलेल्या मीमांसासंप्रदायाने या चार प्रमाणांबरोबर अर्थापत्ती व अनुपलब्धी या सहा प्रमाणांचा स्वीकार केला. मात्र त्यानंतर आलेल्या प्रभाकराच्या मीमांसा संप्रदायाने अनुपलब्धी हे प्रमाण नाकारले व पाचच प्रमाणांना मान्यता दिली. वेदान्त दर्शनानेही कुमारिल भट्टाप्रमाणे सहा प्रमाणांची स्वीकृती केलेली आहे. या मतप्रवाहांपेक्षा आपले वेगळेपण जपणाऱ्या जैन दर्शनाने आपल्या ज्ञानमीमांसेत स्मृती, प्रत्यभिज्ञा आणि तर्क या प्रमाणांचा समावेश केलेला दिसून येतो.

भारतीय दर्शनात एखादे प्रमाण स्वीकारणे किंवा नाकारणे ही गोष्ट दोन प्रकारे झालेली दिसते. एक प्रकार म्हणजे एखाद्या प्रमाणाचे प्रमाणत्वच नाकारणे व दुसरा प्रकार म्हणजे एखाद्या प्रमाणाचे स्वतंत्र प्रमाण म्हणून स्थान नाकारणे व त्याचा दुसऱ्या एखाद्या प्रमाणात समावेश करणे. जसे की, चार्वाक दर्शन जेव्हा अनुमान प्रमाण नाकारतात किंवा मीमांसक जेव्हा स्मृति प्रमाण नाकारतात, तेव्हा ते त्यांचा अन्य प्रमाणात समावेश करीत नाहीत, तर त्यांचे प्रमाणत्वच नाकारतात. याउलट, नैयायिक जेव्हा अर्थापत्ती हे प्रमाण नाकारतात, तेव्हा तिचे प्रामाण्य नाकारत नाहीत, तर तिचा अनुमानात समावेश करतात. तसेच वैशेषिक हे प्रत्यक्ष आणि अनुमान अशी दोनच प्रमाणे मानताना उपमान आणि शब्द या प्रमाणांचा अनुमानात समावेश करताना दिसून येतात.

त्याचप्रमाणे ज्ञान होते तेव्हा ते कोणत्या प्रक्रियेने होते, तसेच कोणत्या प्रमेयाचे ज्ञान कोणत्या प्रमाणाने होते हेही भारतीय दर्शनांमधील वादाचे विषय राहिलेला आहे. ज्ञानाचे प्रामाण्य खुद्द त्या ज्ञानावरूनच ठरते, की अन्य ज्ञानांच्या साहाय्याने निर्धारित केले जाते हा प्रामाण्याचा प्रश्नही महत्त्वाचा होता. या संदर्भात मीमांसादर्शन हे 'स्वतः प्रामाण्यावादा'साठी प्रसिद्ध आहे. त्यांच्यासमोर वेद प्रामाण्याचे समर्थन कसे करता येईल हा प्रश्न होता. वेदवाक्यांनी ज्या अतींद्रिय विषयांचे ज्ञान होते, त्यांचे अस्तित्व अन्य प्रमाणांनी सिद्ध झाले पाहिजे, ही अपेक्षा मीमांसकांच्या मते अयोग्य होती. त्यामुळे त्यांनी वेदांना 'स्वतःप्रामाण्य' मानले. न्यायदर्शन हे 'परतःप्रामाण्यावादा'साठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्यानुसार एखादे ज्ञान यथार्थ आहे की अयथार्थ हे त्या ज्ञानापासून जी विषयाकडे प्रवृत्ती होते ती यशस्वी होते की अयशस्वी, यावर अवलंबून असते. म्हणजेच न्याय मतानुसार ज्ञानाचे प्रामाण्य अन्य ज्ञानावर अवलंबून असते. ते 'परतः' असते. या वादात इतर दर्शनांनीही आपापली भूमिका मांडलेली दिसून येते.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

एकाच विषयाचे ज्ञान अनेक प्रमाणांनी होऊ शकते का? हा प्रश्न बौद्ध व नैयायिकांमधील वादाचा विषय राहिलेला आहे. या संदर्भात बौद्धांनी प्रमाणविप्लववाद स्वीकारलेला. त्यांच्या मते, प्रत्यक्ष प्रमाणाने स्वलक्षणाचे (विशेषाचे) ज्ञान होऊ शकते, तर अनुमानाने सामान्यरूप विषयाचेच ज्ञान होते. नैयायिकांच्या मते मात्र विशेष व सामान्य ('व्यक्ती' व 'जाती') या दोन्ही प्रकारच्या विषयांचे ज्ञान प्रत्यक्ष, अनुमान, शब्द अशा अनेक प्रमाणांनी होऊ शकते. या प्रमाणविषयक भूमिका त्या त्या दर्शनांनी शुद्ध तार्किक पद्धतीने मांडल्या व त्यांवर चर्चा केलेली दिसून येते. परंतु भक्ती संप्रदायातही आपल्याला प्रमाणासंबंधीत विचार पहावयास मिळतात. त्यात महानुभाव संप्रदायातील प्रमाणविषयक विचार पाहता भारतीय दर्शनांपेक्षा अतिशय वेगळे स्वरूपाची पहावयास मिळते. त्यांचे हे प्रमाणाविषयी विचार पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येतील.

महानुभावांचे 'प्रमाण' विषयक विचार :

महानुभाव संप्रदायाचा जो विस्तार होत गेला त्याचे बीज आपल्याला या पंथाच्या तत्त्वज्ञानात पहावयास मिळते. त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार, "साध्य जो परमेश्वर आहे त्याचे साधन आचरण्यासाठी आप्तवाक्याची आवश्यकता असते आणि हे आप्तवाक्य म्हणजेच साधनास उपकारक असणारे 'प्रमाण' होय"1 अशी प्रमाणाची व्याख्या महानुभावांनी केलेली आहे. यामुळे महानुभावांना आपल्या आचार-विचारांच्या बाबतीत जर कुणाची वचने 'प्रमाण' असतील तर ती फक्त परमेश्वरावतारांची! इतरांची वचने ते मुळीच प्रमाण मानीत नाहीत. त्यांच्या दृष्टीने असे परमेश्वरावतार पाच आहेत, त्यांनाच ते 'पंचकृष्ण' म्हणून संबोधतात. श्रीदत्तात्रेय, श्रीकृष्ण, श्रीचक्रपाणी, श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर यांचा यात समावेश होतो. अर्थात् या पंचकृष्णाचीच वचने त्यांना प्रमाणभूत होत, इतरांची नव्हेत.

या पाच अवतारांपैकी श्रीदत्तात्रेय आणि श्रीचक्रपाणी यांचा उपदेश स्वतंत्र रीतीने उपलब्ध होत नाही. पण श्रीचक्रपाणींची जी खास थोडीफार वचने आहेत ती अर्थातच महानुभावांना प्रमाण म्हणून मान्य आहेत. तसेच भगवान् श्रीकृष्णाची 'गीता' ही तर महानुभाव प्रमाणग्रंथ म्हणून मानतातच. 'बाइ: गीता श्रीकृष्णोक्ति: एर अवघी व्यासोक्ति' (सू.वि.मा. 109) असे प्रमाणपत्र श्रीचक्रधरांनी सूत्रपाठाच्या विचारमालिका या पाठात दिलेले आहेच. याचा अर्थ असा की, 'श्रीकृष्णोक्ति तीच खरी गीता; गीतेतील इतर भाग व्यासोक्ति होय'. म्हणून भगवद्गीतेतही श्रीकृष्णाच्या मुखीची जी वचने आहेत तीच महानुभावांना प्रमाण आहेत.

पंचअवतारांपैकी श्रीगोविंदप्रभू हे उभयदृश्यावतार महानुभावांनी मानले असले तरी हा त्यांचा अवतार 'वेडापिसा' होता आणि त्यांचे वर्तनही तसेच असायचे. आचार-विचारपर त्यांची ज्ञानवचने फारशी त्यांनी उच्चारलेली दिसत नाही. पण जी आहेत ती अर्थात् महानुभावांना प्रमाण म्हणून मान्य असल्याचे दिसते. या संदर्भात एक सुंदर उदाहरण प्रसिद्ध आहे. 'मातापुरा कोल्हापुरा न वचावे' (सू. आ. 25) अशी श्रीचक्रधरांची आज्ञा आहे. पण त्यांच्या अविद्यमानी श्रीगोविंदप्रभूंनी नागदेवाचार्यांना 'आवी मेली जाए: मातापुरासि जाए म्हणे' (गोविंदप्रभू चरित्र 323/ स्मृति. 95) अशी आज्ञा केली. श्रीगोविंदप्रभू हे श्रीचक्रधरांनाही वंद्य असल्यामुळे श्रीचक्रधरांची निषेधपर आज्ञा मोडूनही नागदेवाचार्यांनी श्रीप्रभूंची आज्ञा प्रमाण मानली आणि त्याप्रमाणे ते मातापुरला गेले. आजही त्यांच्या या आज्ञेचा आधार घेऊनच काही महानुभाव महंत माहूरला जाताना दिसतात. यावरून श्रीगोविंदप्रभूंच्या वचनांना महानुभावांच्या

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– II
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

दृष्टीने असलेले प्रामाण्य लक्षात येते.

श्रीचक्रधर हे पंचअवताराचे शेवटचे अवतार असून महानुभाव पंथाचे संस्थापक होय. ते उभयदृष्या परमेश्वरावतार होत अशी महानुभावांची श्रद्धा होय. म्हणून त्यांच्या वचनांना प्रामाण्य आहे. इतकेच नाही तर पंचकृष्णामध्ये श्रीचक्रधर अवतार हा सर्वश्रेष्ठ अवतार मानला गेला आहे. कारण त्यांना फक्त जीवोद्धरणाचे व्यसन होते, असे महानुभाव महंत मानीत असल्यामुळे त्यांच्या वचनांना विशेष 'प्रमाण' महानुभाव संप्रदायात असलेले दिसतात. श्रीचक्रधरांनी संन्यासदीक्षा घेतल्यानंतर आपले सर्व आयुष्य आपल्या अनुयायांना विशिष्ट तत्त्वज्ञान व आचारधर्म यांची शिकवण देण्यात घालविले. त्या निमित्ताने त्यांनी केलेला उपदेश केसोबासांनी संकलित करून ठेवलेल्या सूत्रपाठात अंतर्भूत झालेली आहे. ती सूत्रे अथवा वचने हीच प्रामुख्याने महानुभावांना प्रमाण आहेत. त्यात न आलेली पण लीळाचरित्रात 'श्रीमुखोक्त' म्हणजे श्रीचक्रधरांच्या तोंडी असलेली वचनेही महानुभावांना प्रमाण होत. थोडक्यात श्रीचक्रधरांची वचने व गीतेतील श्रीकृष्णोक्ती यांनाच महानुभावांच्या दृष्टिने प्रामाण्य आहे. यादृष्टिने महानुभावांनी एकूण किती प्रमाणे मानलेली आहेत याचा विचार पुढीलप्रमाणे.

महानुभावांची 'प्रमाणे' :

महानुभाव संप्रदायात प्रमाणांची संख्या त्रिविध ('तत् त्रिविधम्: श्रुतिस्मृतिवृद्धाचारनिर्णयाख्याम्।' लक्षणरत्नाकर 2)2 म्हणजे तीन प्रमाणे मानलेली आहे. ही त्रिविध प्रमाणे म्हणजे; 1. श्रुती, 2. स्मृती, 3. वृद्धाचार हे होय. पण नंतर यामध्ये 4. मार्गरूढी आणि 5. वर्तमान या प्रमाणांची भर घालून प्रमाणांची ही संख्या महानुभावांनी पाचपर्यंत वाढवलेली दिसते. या संबंधात दत्तोमुनी दुतोंडे यांच्या अन्वयस्थळात या पाच प्रमाणांची व्याख्या पुढील प्रमाणे आलेली दिसून येते.

"वैद्य दत्तोबासी म्हणितले: परमेश्वराचे श्रीमुखोक्त निरूपण ते श्रुति: भटा: बाईसा: माहादाइसा: म्हाइंभटा: उपाध्या: एवमादिकाचे निरूपण ते स्मृती: भटाचे सिक्ष बाइदेवोबा: पंडित: केशवदेव: कविश्वर: आनोबास एवमादिकाचे निरूपण जे वृद्धाचार: कवीश्वरादिकाचे शिष्य परशरामबास: रामेश्वरबास: वासुदेवभट: नागनाथबास: हिरण्यगर्भबास: कवि मालोबास: एवमादिकाचे निरूपण ते: परशरामबासादिकाचे शिष्ये पेटे हरिबास तयाचे अचळ मुरारीबास आन तयासमान जैसे ओंकारबास: नायंबास: पाटकुले मालोबास एवमादिकाचे निरूपण ते मार्गरूढ: अचळादिकाचे शिष्य जैसे शिवबास: जैसे विसोबास: बहाळे नारोबास एवमादिकाचे निरूपण ते वर्तमान: या पांचा प्रमाणी जो अर्थनिर्धार तोचि येथार्थ:"3

याचा अर्थ असा की, पंथाचे संस्थापक जे श्रीचक्रधर ते परमेश्वरावतार असल्याकारणाने त्यांची वचने, म्हणजे श्रुती, सर्वांत अधिक प्रमाण होत. पण त्या खालोखाल नागदेवाचार्यादिकांच्या वचनांनाही, म्हणजे स्मृतींनाही, प्रामाण्य आहे. या पंचविध प्रमाणांत जसजसे मागे जावे तसतसे प्रामाण्य अधिक येते व त्यामुळे श्रीचक्रधरांची वचने, अर्थात् 'सूत्रपाठ' प्रामाण्याच्या दृष्टिने सर्वश्रेष्ठ ठरतो. महानुभाव पंथाचे तात्त्विक व चरित्रात्मक ग्रंथ या प्रामाण्यमालिकेच्या कल्पनेतून निर्माण झालेले असल्याने त्या ग्रंथांच्या यथार्थ आकलनासाठी ती कल्पना लक्षात घेणे आवश्यक आहे. या कल्पनेनुसार त्यांच्या आद्य ग्रंथांची विभागणी पुढीलप्रमाणे होते.

"परमेश्वरोक्त सूत्रमात्र अधिकरणासि (म्ह. नागदेवाचार्यांना) श्रुत जालें: भणौनि: परमेश्वरोक्त सूत्रमात्र श्रुति शब्दें बोलिजे: परमेश्वराचें

विहरण वर्तन दाविलें तैसें स्मरौनि अधिकरणें साधिकरणाप्रति निरूपिलें जें लीळाचरित्र ते स्मृति बोलिजे:.... परमेश्वराचा आणि अधिकरणाचा वृत्तांतु विचारु व्यवहारु तो साधिकरणीं केशवादी महानुभावी बंधीं लिहीला तो वृद्धाचार: ऐसे श्रुतिस्मृतिवृद्धाचार-भेदें त्रिविध प्रमाण जाणावें।।"4

वरील मांडणीत भिन्न कालखंडाची कल्पना अभिप्रेत दिसते. या कल्पनेनुसार श्रीचक्रधरांच्या प्रयाणापर्यंतचा वृत्तांत 'लीळाचरित्र' या ग्रंथात येतो. त्यांच्या प्रयाणापासून तो नागदेवाचार्यांच्या अखेरीपर्यंतचा वृत्तांत 'स्मृतिस्थळ' ग्रंथात येतो. तर नागदेवाचार्यांच्या मृत्यूपासून पुढील (नागाइसेपर्यंत) वृत्तांत हा 'वृद्धाचार' या ग्रंथात येतो आणि यानंतरच्या गुर्जरशिवबासापर्यंतच्या काळातील वृत्तांत 'मार्गरूढी'त समाविष्ट होता.

त्याचप्रमाणे अशाच प्रकारच्या महानुभावांच्या प्रमाणाविषयी सिद्धान्ते हरिबास आणि धाकुटे सोंगोबास यांच्या 'अन्वयस्थळा'च्या सुरुवातीला पहिल्या चार प्रमाणांचा उल्लेख आलेला आहे. परंतु, त्यात पाचव्या 'वर्तमान' प्रमाणाचा उल्लेख आलेला दिसत असला; तरी प्रमाण म्हणून त्याचा स्वतंत्र उल्लेख आलेला दिसून येत नाही.

"आनुसरलिया मार्गिका च्यारि प्रमाणे: श्रुति 1: स्मृति 2: वृद्धाचार 3: मार्गरूढि 4: सर्वज्ञाचे श्रीमुख ते श्रुति ॥ भटाचे वर्तमान ते स्मृति ॥ रामेश्वरबा: परसरामबा: हरदमुनिबास: हीराइसे: नागाइसे: हा वृद्धाचार ॥ ऊँकारबास: धारासिव अचळ मुरारीबास: सिद्धान्ते हरिबास गुजर सिवबासापर्यंत मार्गरूढ: मग ऐलाडी काही जीवहेतु संचरला म्हणौनि हे च्याऱ्ही मार्गासी प्रमाणे ।।"5

यावरून श्रुति, स्मृति, वृद्धाचार, मार्गरूढ आणि वर्तमान अशी ही पाच 'प्रमाणे' महानुभावांना मान्य असल्याचे दिसून येते. त्यातही जसजसे मागे जावे तसतसे प्रामाण्य अधिक. म्हणजे वर्तमानापेक्षा मार्गरूढीला प्रामाण्य अधिक, मार्गरूढीपेक्षा वृद्धाचाराला प्रामाण्य अधिक, वृद्धाचारापेक्षा स्मृतीला आणि स्मृतीपेक्षाही श्रुतीला अर्थात् परमेश्वराच्या श्रीमुखोक्तीला सर्वात अधिक प्रामाण्य आहे. येथे स्मृतीला म्हणजे प्रामुख्याने नागदेवाचार्यांच्या वचनांना प्रामाण्य का? असा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर असे द्यावे लागेल की, नागदेवाचार्य हे श्रीचक्रधरनिरूपित शास्त्रात इतके पारंगत झालेले होते की त्यांच्या तोंडून त्या शास्त्राला सोडून असे काहीही निघणे अशक्य होते. या बाबतीत प्रत्यक्ष श्रीचक्रधरांनी नागदेवाचार्यांना प्रशस्तिपत्रकच दिलेले दिसते. 'तुझेनि मुखे अशास्त्रीय न नीगे की' (सू. वि. 159) असे स्वतः नागदेवांना म्हणाले होते. 'बाई: हा काही आपुले बोलैल हा एथिचेचि बोलैल की' (सू. वि. 160) अशी नागदेवाचार्यांची स्तुती श्रीचक्रधरांनी बाइसाजवळ केली होती. यावरून खास श्रीचक्रधरांची ही प्रशस्तिपत्रके असल्यामुळे नागदेवाचार्यांच्या उक्तीला प्रामाण्य आल्याचे आपल्याला दिसून येते.

अशाप्रकारे वैदिकांना ज्याप्रमाणे प्रामुख्याने वेदांची वचने प्रमाण असली तरी स्मृत्यादी ग्रंथांनाही ते प्रमाण मानतात, त्याप्रमाणे महानुभावांना प्रत्यक्ष श्रीमुखीची वचने, अर्थात् परमेश्वरावतारांच्या उक्ती (श्रुती) ह्याच मुख्यत्वे प्रमाण म्हणून मान्य असल्यातरी गौणत्वाने का होईना पण नागदेवाचार्यादिकांच्या वचनांनाही (स्मृतींनाही) ते प्रमाण मानताना दिसून येतात.

**संदर्भग्रंथ :**

➢ नेने, हरी नारायण (संपा.), 'लक्षणरत्नाकर'; रघुनाथ दिवेकर प्रकाशक, नागपूर, 1937, बत्तीस लक्षणाची टीप 2, पृ. 3.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

➢ (‘फळश्रुतिश्रवणें: फळप्राप्तिकारणें: प्रवर्तला जो पुरुष तयासि साधन आचरावया आप्तवाक्य होआवेंचि लागे: भणौनि प्रतिज्ञेउपरि प्रमाण बोलिलें.......: तया प्रमाणाचें लक्षण त्यें ऐसें: अनुभवसाधनासि उपकारक तें प्रमाण: ॥)

➢ नेने, हरी नारायण (संपा.), ‘लक्षणरत्नाकर’, पूर्वोक्त, पृ. 5.

➢ आवलगावकर, रमेश वा., ‘महानुभावांची अन्वयस्थळे’, चंद्रकला प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1996, दत्तमुनी दुतोंडे यांचे अन्वयस्थळ क्र. 4, पृ. 117.

➢ नेने, हरी नारायण (संपा.), ‘लक्षणरत्नाकर’; रघुनाथ दिवेकर प्रकाशक, नागपूर, 1937, बत्तीस लक्षणाची टीप 2, पृ. 7.

➢ कोलते, वि. भि., ‘महानुभाव संशोधन – 1’, अरूण प्रकाशन, मलकापूर (बुलढाणा), आवृत्ती पहिली, 1962, पृ. 61.

**Cite This Article:**
*डॉ. सचिन ख. राजपूत, (2022*) महानुभाव संप्रदायातील ‘प्रमाण’ विचार , ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 121-126.*